# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३२६ - २३** **दिनांक : - २१/०९/२०२३**

**म्हाडा चे अधिकारी/कर्मचारी असल्याचे सांगून, लोकांचा विश्वास संपादन करुन म्हाडामध्ये सदनिका मिळवून देतो असे खोटे सांगुन फसवणुक करणा-याचे विरुध्द भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**गुन्हे शाखा युनिट -०१ काशिमीरा यांची कामगीरी**

दिनांक २०/०९/२०२३ रोजी गुन्हे शाखा युनिट-०१ येथे गुप्त बातमीरांचे मार्फत माहीती मिळाली कि, '' मिरा-भाईंदर परिसरामध्ये काही लोक म्हाडा चे अधिकारी/कर्मचारी असल्याचे सांगून, लोकांचा विश्वास संपादन करुन म्हाडामध्ये सदनिका मिळवून देतो असे खोटे सांगुन त्यांचेकडुन लाखो रुपये घेवुन फसवणुक करीत आहेत. '' मिळालेल्या माहीतीवरुन राई, भाईंदर प. येथे सापळा कारवाई करुन आरोपी नामे

**१) जावेद अल्लीशा पटेल, रा. गोरेगाव पुर्व मुंबई .**
**२) मोइनउद्दीन सलीमउद्दीन खान, रा. मिरारोड पुर्व, ठाणे.**
**३) अफसर ईशाद शेख, रा. मुंब्रा, ठाणे.**
**४) सुजीत दत्ताराम चव्हाण रा. मिरारोड पुर्व, ठाणे.**
**५) राजेंद्रप्रसाद राजकारण यादव रा. भाईंदर प. ठाणे.**

यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या चौकशी मध्ये त्यांनी खालील प्रकारे लोकांची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले.

वर नमुद आरोपीत व त्यांचे इतर साथीदार यांनी फौजदारी पत्र कट रचुन फिर्यादी व त्यांच्या दोन मुली व मुलगा यांना ते म्हाडाचे अधिकारी असले बाबतचे ओळखपत्र दाखवून त्यांचा विश्वास संपादन करुन म्हाडामध्ये सदनिका मिळवून देतो असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांचेकडून न्यु स्कायलाईन म्हाडा वसाहत, मिरारोड पु, ठाणे येथे तीन सदनिका मिळवून देणेसाठी रुपये १०,००,०००/- (दहा लाख) घेतले. तसेच म्हाडाचे विविध खोट्या व बनावट कागदपत्रांवर त्यांच्या दोन मुली व मुलाच्या सह्या घेउन सदनिका अदा केलेबाबत म्हाडाची बनावट/खोटी कागदपत्रे देवुन फसवणुक केलेली आहे. तसेच वर नमुद इसमांचे ताब्यात इतर लोकांना म्हाडा मध्ये सदनिका देणे संदर्भातील बनावट/खोटी कागदपत्रे मिळून आली आहेत.

सौ. शोभा बालाजी जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन भाईंदर पोलीस ठाण्यात गु.रजि.क्र ३६५/२०२३ भा.द.वि.स कलम ४२०,४६५,४६७,४७१,१२०-ब प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात आरोपींना काशिमीरा गुन्हे शाखा कक्ष-०१ मार्फत अटक करुन पुढील तपास कामी भाईंदर पोलीस ठाणे येथे हजर केलेले आहे.

या प्रमाणे वर नमुद इसमांनी अश्या प्रकारे कोणाची म्हाडा चे अधिकारी/कर्मचारी असल्याचे सांगून, म्हाडामध्ये सदनिका मिळवून देतो असे खोटे सांगुन पैसे घेवुन फसवणुक केली असल्यास त्यांनी भाईंदर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा. संपर्क क्रमांक ०२२२८१९२२५७, ०८६५७९३६९५१.

सदरची कामगीरी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, पुष्पराज सुर्वे, स.फौ. राजु तांबे, पो.हवा. सचिन हुले, पो.हवा.विजय गायकवाड, समीर यादव, सुधीर खोत,पो.अं. प्रशांत विसपुते, सनी सुर्यवंशी, मसुब.किरण आसवले यांनी केली आहे.